# रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्यकचेरी : प्लॉट क्र.बीसी/१, गेट क्र.५ च्या शेजारी, पेट्रोलपंपाच्या मागे, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११०३७

९७३००४०१६० www.rupeebank.com gadm@rupeebank.com


जा.क्र.आरसीबी/०१/साप्र/चांना/ईनि/१९८/२०२६-२७/ दि.०७.०७.२०२६

## बँकेकडील चांदीच्या नाण्यांची ई-निविदा प्रक्रिया राबवून जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची नोटीस व अटीशर्ती

बँकेकडील चांदीची नाणी ई-निविदा राबवून जाहीर लिलावाद्वारे विक्री करणेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणेः-

**(अ) एका बाजूस बँकेचे नांव व लोगो व दुसऱ्या बाजूस लक्ष्मीची प्रतिमा असलेली चांदीची नाणी :**

| अ.क्र | वजन (ग्रॅममध्ये) | संख्या | एकूण अंदाजे वजन (ग्रॅममध्ये) |
|---|---|---|---|
| १ | १० ग्रॅम | ३९६७ | ३९६७० |
| २ | ५० ग्रॅम | १२७ | ६३५० |
| ३ | १०० ग्रॅम | ३४२ | ३४२०० |
| **एकूण संख्या** | | **४४३६** | **८०२२०** |

**(ब) बँकेची प्रतिमा नसलेली चांदीची नाणी/वस्तू :**

| अ.क्र | वजन (ग्रॅममध्ये) | संख्या | एकूण अंदाजे वजन (ग्रॅममध्ये) |
|---|---|---|---|
| १ | १० ग्रॅम | ६ | ६० |
| २ | २० ग्रॅम | ४ | ८० |
| ३ | २५ ग्रॅम | २ | ५० |
| **एकूण संख्या** | | **१२** | **१९०** |

वरीलप्रमाणे एकूण चांदीची नाणी/वस्तू ४४४८ असून त्याचे एकूण अंदाजे वजन ८०४१० ग्रॅम आहे.

**अटीशर्ती :**

१. दि.०१.०६.२०२६ च्या पत्रान्वये मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी म.स.का.१९६० चे कलम १०५ (१) (क) व म.स.नियम १९६१ चे नियम ८९ (१४) अन्वये रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) या बँकेतील चांदीच्या नाण्यांचे वाजवी मूल्य (अपसेट प्राईस) निश्चित करून मिळणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता व सदर मालमत्ता विक्रीस, विक्री पूर्व परवानगी देण्यात आली आहे.

यासाठी चांदीच्या नाण्यांचे दि.०६.०७.२०२६ रोजीचे दर विचारात घेऊन वाजवी मूल्य/आधारभूत किंमत रक्कम ₹२,१५,०००/- प्रति किलो निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि चांदीच्या भावात सातत्याने चढ-उतार होत असल्यामुळे सदरचे वाजवी मूल्य/आधारभूत किंमत किंवा लिलावाचे दिवशीचे म्हणजेच दि.३१.०७.२०२६ रोजीचे सकाळी ११.०० वाजताचे चांदीच्या नाण्यांच्या खरेदीच्या दराच्या ९५% रक्कम यापैकी जी सर्वोच्च असेल त्या रकमेपेक्षा कमी रकमेची बोली स्विकारली जाणार नाही.

त्यानुसार सदर चांदीच्या नाणी यांची **'जसे आहे, जेथे आहे, जे कांही आहे व कोणतीही तक्रार नाही'** या तत्वावर सदर नोटीसीद्वारे **ई-निविदा प्रक्रिया राबवून** जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल.



RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

२. त्यानुसार चांदीची नाणी/वस्तू यांचे वाजवी मूल्य, ई-लिलाव दस्तऐवज खर्च व बयाणा रक्कम पुढीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | तपशिल | | नाण्यांची संख्या | एकूण अंदाजे वजन (ग्रॅममध्ये) | वाजवी मूल्य | बयाणा रक्कम | ई-लिलाव दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) विनापरतावा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | एका बाजूस बँकेचा लोगो व दुसऱ्या बाजूस लक्ष्मीची प्रतिमा असलेली चांदीची नाणी | १० ग्रॅम | ३९६७ | ३९६७० | चांदीच्या नाण्यांचे दि.०६.०७.२०२६ रोजीचे दर विचारात घेऊन वाजवी मूल्य/आधारभूत किंमत रक्कम ₹२,१५,०००/- प्रति किलो निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि चांदीच्या भावात सातत्याने चढ-उतार होत असल्यामुळे सदरचे वाजवी मूल्य/ आधारभूत किंमत किंवा लिलावाचे दिवशीचे म्हणजेच दि.३१.०७.२०२६ रोजीचे सकाळी ११.०० वाजताचे चांदीच्या नाण्यांच्या खरेदीच्या दराच्या ९५% रकमेपेक्षा कमी रकमेची बोली स्विकारली जाणार नाही. | ₹२५ लाख | ₹५००० अधिक १८% जीएसटी ₹९०० |
| | | ५० ग्रॅम | १२७ | ६३५० | | | |
| | | १०० ग्रॅम | ३४२ | ३४२०० | | | |
| | एकूण (अ) | | ४४३६ | ८०२२० | | | |
| ब | बँकेची प्रतिमा नसेलली चांदीची नाणी/वस्तू | १० ग्रॅम | ६ | ६० | | | |
| | | २० ग्रॅम | ४ | ८० | | | |
| | | २५ ग्रॅम | २ | ५० | | | |
| | एकूण (ब) | | १२ | १९० | | | |
| | एकूण (अ+ब) | | ४४४८ | ८०४१० | | ₹२५ लाख | ₹५९०० |

*** वरील (अ) व (ब) साठी एकत्रित बयाणा रक्कम ₹२५ लाख राहील तसेच ई-लिलाव दस्तऐवज खर्च ₹५०००/- अधिक १८% जीएसटी रक्कम याप्रमाणे राहील.**

**** सदर वाजवी मूल्यामध्ये जीएसटीचा समावेश नसेल. जीएसटीची स्वतंत्ररित्या आकारणी केली जाईल.**

३. जाहीर ई-लिलावाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | चांदीच्या नाण्यांचे दि.०६.०७.२०२६ रोजीचे दर विचारात घेऊन वाजवी मूल्य/आधारभूत किंमत रक्कम ₹२,१५,०००/- प्रति किलो निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि चांदीच्या भावात सातत्याने चढ-उतार होत असल्यामुळे सदरचे वाजवी मूल्य/आधारभूत किंमत किंवा लिलावाचे दिवशीचे म्हणजेच दि.३१.०७.२०२६ रोजीचे सकाळी ११.०० वाजताचे चांदीच्या नाण्यांच्या खरेदीच्या दराच्या ९५% रकमेपेक्षा कमी रकमेची बोली स्विकारली जाणार नाही. | | |
| २ | जाहीर ई-लिलाव प्रसिध्दी दिनांक | गुरुवार, दि.०९.०७.२०२६ | सकाळी ११ वा. |
| ३ | प्राथमिक माहिती अर्ज बँकेकडून घेण्याच्या सुरवातीचा दिनांक - पासून (सुट्टीचे दिवस सोडून) | गुरुवार, दि.०९.०७.२०२६ | दुपारी १२ ते सायं.५ वाजेपर्यंत |
| ४ | प्राथमिक माहिती अर्ज बँकेत सादर करण्याचा अंतिम दिनांक - पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) | बुधवार, दि.१५.०७.२०२६ | दुपारी १२ ते सायं.५ वाजेपर्यंत |
| ५ | चांदीची प्रातिनिधिक नाणी व मुल्यांकन अहवाल पाहणीसाठी दिनांक व वेळ (स्थळ - शिवाजीनगर शाखा, जंगली महाराज रोड, पुणे ४११००५) | गुरुवार, दि.१६.०७.२०२६ ते शनिवार, दि.१८.०७.२०२६ | दुपारी १२ ते सायं.५ वाजेपर्यंत |
| ६ | बयाणा रक्कम ₹२५ लाख भरणा करुन eAuction पोर्टल वर नोंदणी करण्याचा सुरुवातीचा दिनांक | शुक्रवार, दि.१७.०७.२०२६ | -- |
| ७ | बयाणा रक्कम ₹२५ लाख भरणा करुन eAuction पोर्टल वर नोंदणी करण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार, दि.२४.०७.२०२६ | सकाळी ११ ते सायं.५ वाजेपर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | पात्र निविदाधारकांकडून आलेले निविदा अर्ज मंजुरीची अंतिम दिनांक, वेळ व पात्रतेबाबत पात्र सहभागीदारांना त्यांचे ईमेल व /अथवा व्हॉटस्ॲपवर कळविणे. | सोमवार, दि.२७.०७.२०२६ व मंगळवार, दि.२८.०७.२०२६ | सकाळी ११ ते सायं.५ वाजेपर्यंत |
| ९ | जाहीर ई-लिलाव सुरु होण्याचा दिनांक व वेळ<br><br>दि.०६.०७.२०२६ रोजीचे वाजवी मूल्य ₹२,१५,०००/- प्रति किलो या पेक्षा चांदीच्या नाण्यांच्या किंमतीत चढ-उतार झाल्यास, दि.३१.०७.२०२६ रोजीचे चांदीच्या नाण्यांचे प्रति किलोचे दर विचारात घेऊन लिलावात भाग घेणाऱ्यांनी eAuction पोर्टलवर बोली लावावी. | शुक्रवार, दि.३१.०७.२०२६ | दुपारी १२ ते दुपारी ३ वाजेपर्यंत परंतु लिलावात भाग घेणारे व्यापारी/सहभागी खरेदीदार यांनी लावलेल्या ई-बोलीनुसार आवश्यकता भासल्यास अंतिम बोलीपर्यंत एका वेळेस ५ मिनिटे याप्रमाणे वेळ वाढविण्यात येईल. |
| १० | यशस्वी ई-लिलाव बोलीधारक यांनी किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी बँकेच्या मुख्यकार्यालयात समक्ष येवून चांदीच्या सर्व नाण्यांचे वजन करुन घेणे व त्याबाबत खातरजमा करणे व अंतिम लिलाव रकमेच्या १५% रक्कम त्याच दिवशी डिमांडड्राफ्ट अथवा ईपेमेंटद्वारे जमा करावा लागेल.<br>**ही बाब विचारात घेता ई-लिलाव बोलीधारक पुणे येथे मुक्कामी समक्ष उपस्थित असणे आवश्यक आहे.** | शुक्रवार, दि.३१.०७.२०२६ | दुपारी ४.०० वाजेपर्यंत किंवा अंतिम बोली झाल्यानंतर |
| ११ | उर्वरित रक्कम जीएसटीसह भरणा करण्याचा अंतिम दिनांक | सोमवार, दि.३१.०८.२०२६ | सकाळी ११ ते सायं.५ वाजेपर्यंत |

४. सदर ई-लिलावाद्वारे विक्री करण्याबाबतची दैनिक लोकसत्ता व Indian Express या दैनिकांच्या पुणे आवृत्यांमध्ये दि.०९.०७.२०२६ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच बँकेच्या www.rupeebank.com या संकेतस्थळावर त्याचप्रमाणे बँकेच्या मुख्यकचेरीच्या व शाखा कार्यालयाच्या सूचना फलकांवर बँकेचे सभासद/ ठेवीदार व तमाम लोकांसाठी दर्शनी भागात प्रसिध्द करण्यात येईल.

५. जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या संस्थेस/व्यक्तीस ई-लिलाव दस्तऐवज खर्च रक्कम ₹५०००/- अधिक जीएसटी १८% याप्रमाणे रक्कम ₹५९००/- आरटीजीएस/एनईएफटी/डिमांडड्राफ्ट/ई-पेमेंटद्वारे अ.क्र.७ मध्ये नमूद केलेल्या तपशिलानुसार बँकेच्या खात्यात/बँकेकडे जमा करणे आवश्यक आहे. सदरची रक्कम विनापरतावा असेल.

**त्यानंतरच बँकेने विक्री उपलब्ध असलेल्या चांदीची नाणी यापैकी प्रातिनिधिक स्वरुपातील चांदीची नाणी इच्छुक खरेदीदारांना खालील पत्त्यावर समक्ष येऊन पाहता येतील.**

रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात), शिवाजीनगर शाखा
लक्ष्मी-बळवंत चेंबर्स, ११७०/२, जंगली महाराज रोड, मॉडर्न हायस्कूल चौकाजवळ,
शिवाजीनगर, पुणे ४११००५

६. वरील नाण्यांपैकी बँकेने प्रातिनिधिक स्वरुपात काही नाण्यांचे मुल्यांकन शासन मान्यताप्राप्त नोंदणीकृत मुल्यांकनकार श्री.वास्तुपाल रांका, श्री.राकेश ओसवाल व श्री.पराग यशवंत गाडगीळ यांचेकडून करवून घेतले आहे. त्यानुसार सदरची प्रातिनिधिक मुल्यांकन केलेली नाणी व त्याबाबत मुल्यांकनकार यांनी दिलेले मुल्यांकन अहवाल प्रत्यक्ष पाहणीसाठी बँकेच्या शिवाजीनगर शाखा इमारतीत नियोजीत दिवशी सकाळी ११.०० ते सायं.५.०० या वेळेमध्ये पाहणीसाठी उपलब्ध राहतील. लिलावात भाग घेण्यासाठी व्यक्ती/संस्थांचा पुरेसा प्रतिसाद न लाभल्यास, यासाठी आवश्यकतेनुसार मुदतवाढ देण्याचा किंवा अन्य दिवस निश्चित करण्याचा अधिकार अवसायक यांचा असेल.



RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

७. **प्रातिनिधिक स्वरुपात चांदीची नाणी यांची पाहणी केल्यानंतर, जाहीर लिलावात भाग घेताना भरावयाच्या निविदा अर्जासोबत वर नमूद केल्यानुसार बयाणा रक्कम ₹२५ लाख, 'रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)' यांच्या खालील बँक तपशीलाप्रमाणे डिमांड ड्राफ्ट/ आरटीजीएस/ एनईएफटी/ ई-पेमेंटद्वारे भरावी लागेल.**

| | |
|---|---|
| Name of Beneficiary | : Rupee Coop. Bank Ltd., Pune |
| Name of the Bank | : State Bank of India |
| Name of the Branch | : Pune Main Branch, Collector Office Compound, Pune |
| Account No. | : 11099450523 [ IFSC No. SBIN0000454 ] |

***(बयाणा रक्कम व ई-लिलाव दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) - दोन स्वतंत्र डीडी/आरटीजीएस/एनईएफटी/इपेमेंट नुसार भरणे आवश्यक आहे.)***

सदरच्या दस्तऐवज खर्च व बयाणा रकमेचे पेमेंट केल्याच्या पावत्या अनुक्रमे लिफाफा-१ व लिफाफा-२ मध्ये ई-लिलावाच्या वेळी जमा कराव्या लागतील.

८. कोणत्याही परिस्थितीत धनादेश स्विकारले जाणार नाहीत. ज्या सहभागी खरेदीदार/व्यक्तीने बयाणा रक्कम व ई-लिलाव दस्तऐवज खर्च (जीएसटीसह) या रकमां बँकेस विहित मुदतीत भरल्या असतील त्यांनाच लिलावात सहभाग घेण्यासाठी पात्र करण्यात येईल व जाहीर ई-लिलावात भाग घेता येईल.

९. **उपरोक्त पृष्ठ क्र.१ वरील तक्ता क्र.(अ) व तक्ता क्र.(ब) मध्ये नमूद केलेली लक्ष्मीची प्रतिमा व बँकेचा लोगो असलेली चांदीची नाणी व बँकेची प्रतिमा नसलेली चांदीची नाणी/वस्तू या सर्वच्या सर्व नाणी/ वस्तू विकत घेण्याबाबत निविदा अर्ज सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत सहभागी खरेदीदारास अंशतः चांदीची नाणी/वस्तू यांची खरेदी करता येणार नाही व/अथवा एकापेक्षा जास्त इच्छुक खरेदीदारांनी एकत्रितपणे निविदा सादर करता येणार नाही. अशा प्रकारच्या अंशतः खरेदीच्या अथवा संयुक्तपणे सादर केलेल्या निविदा अपात्र ठरविण्यात येतील.**

१०. ई-निविदा प्रक्रिया सहभागानंतर निविदाधारकांच्या virtual/आभासी उपस्थितीत खालील संकेतस्थळावर पार पाडली जाईल. यापैकी वाजवी मुल्यांकनापेक्षा अधिक असणाऱ्या सर्व निविदाधारकांना स्पर्धात्मक दराने ऑनलाईन संधी उपलब्ध करुन देऊन लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

**ई-लिलाव पोर्टल : www.eauction.gov.in**

११. जाहीर ई-लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीने ई-लिलावाच्या वेळी स्वतःचे पॅनकार्ड, आधारकार्ड अपलोड करावे. संस्था असल्यास, संस्था नोंदणी दाखला, पत्त्याचा पुरावा, संस्थेचे पॅनकार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट लायसेन्स, प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे अधिकार पत्र, केवायसी इत्यादी कागदपत्रे अपलोड करावीत.

१२. **महत्वाची अट : चांदीच्या नाण्यांचे दि.०६.०७.२०२६ रोजीचे दर विचारात घेऊन वाजवी मूल्य/आधारभूत किंमत रक्कम ₹२,१५,०००/- प्रति किलो निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि चांदीच्या भावात सातत्याने चढ-उतार होत असल्यामुळे सदरचे वाजवी मूल्य/आधारभूत किंमत किंवा लिलावाचे दिवशीचे म्हणजेच दि.३१.०७.२०२६ रोजीचे सकाळी ११.०० वाजताचे चांदीच्या नाण्यांच्या खरेदीच्या दराच्या ९५% रकमेपेक्षा कमी रकमेची बोली स्विकारली जाणार नाही.**

१३. **तथापि लिलाव प्रक्रियेतील दोन बोलीमधील फरकाची रक्कम प्रति किलो किमान ₹१,०००/- किंवा त्यापटीत असणे बंधनकारक राहील.**

RUPEE CO-OP. BANK HEAD OFFICE PUNE

१४. दि.३१.०७.२०२६ रोजी eAuction प्रक्रियेच्या वेळेस काही तांत्रिक कारणास्तव अडचण निर्माण होऊन ई-लिलाव रद्द करणे भाग पडल्यास, ई-लिलावाची पुढील तारीख व वेळ तसेच सदर ई-लिलावासंदर्भातील आवश्यक ती माहिती बँकेच्या www.rupeebank.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अंतिम लिलाव प्रकियेत सहभागी झालेल्या व्यक्ती/संस्था यांना त्यांचे ईमेलवर/मोबाईलवर त्याबाबत कळविण्यात येईल.

सदर ई-लिलाव प्रकियेबाबत लिलावात सहभाग घेणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना काही माहिती आवश्यक असल्यास त्यांनी बँकेच्या admin@rupeebank.com या ईमेलवर किंवा श्री.प्रविण जोशी, व्यवस्थापक, प्रशासन विभाग (भ्रमणध्वनी क्र.९७३००४०१६०) यांना संपर्क साधावा.

१५. प्रातिनिधिक स्वरुपात नाण्यांचे मुल्यांकन केलेले असल्याने विक्रीसाठी असलेल्या सर्व नाण्यांचे मुल्यांकन, शुध्दता याबाबत तपासणी केली जाणार नाही व सदर सर्व नाण्यांची विक्री 'जसे आहे, जेथे आहे, जे कांही आहे व कोणतीही तक्रार नाही' या तत्वावर ई-लिलावाद्वारे होईल. **चांदीच्या प्रति किलो दराची अंतिम बोली रक्कम निश्चित झाल्यानंतर** व चांदीचे नाणी/वस्तू यांचे यशस्वी लिलाव बोलीदाराच्या किंवा त्यांनी शिक्का/स्वाक्षरीनिशी लेटरहेडवर केवायसीसह प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीसमक्ष प्रत्यक्ष वजन केल्यानंतर यावर व त्यांनी प्रति किलो दिलेल्या बोलीनुसार एकूण खरेदी रक्कम निश्चित करण्यात येईल.

१६. अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांच्या मते वाजवी किंमत न आल्यास सदरचा जाहीर ई-लिलाव पुढे ढकलण्याचा अथवा तहकूब करण्याचा अधिकार अथवा कोणतीही बोली आली नाही तर नाकारण्याचा अधिकार अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांना राहील.

१७. सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा नाकारणे हा अवसायक अथवा प्राधिकृत अधिकारी, रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांचा निर्णय राहील.

१८. लिलावात सर्वाधिक बोलीधारकाने स्विकारलेल्या बोलीच्या १५% रकमेचा त्याच तारखेचा डिमांड ड्राफ्ट (धनाकर्ष) 'रुपी को-ऑप. बँक लि., पुणे' या नावे देणे किंवा ती रक्कम ई-पेमेंटद्वारे रुपी बँकेच्या वर नमूद केलेल्या बँक खात्यात भरणे आवश्यक आहे. तथापि सदरची रक्कम जमा करताना कांही तांत्रिक समस्या/अडचण निर्माण झाल्यास अवसायक यांचा निर्णय अंतिम असेल.

कोणत्याही परिस्थितीत चेक(धनादेश) स्विकारले जाणार नाहीत. निविदा सादर करताना बोलीधारकाने जमा केलेली बयाणा रक्कमेव्यतिरिक्त सदरची १५% रक्कम भरणे आवश्यक आहे. **त्यासाठी रुपी बँकेस "Registered Beneficiary" म्हणून नोंद होण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना / दक्षता लिलावधारकांनी त्यांचे स्तरावर करुन घ्याव्यात.**

लिलावाच्या दिवशी सदरची रक्कम तांत्रिक कारण सोडून अन्य कांही कारणास्तव रुपी बँकेच्या बँकखात्यात जमा न केल्यास अशा परिस्थितीत सर्वोच्च बोलीदार अपात्र ठरल्यास त्याची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व द्वितीय क्रमांकाच्या बोलीदाराची बोली स्विकारणे अथवा फेरलिलाव जाहीर करणे याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार अवसायक यांचा असेल.

१९. तसेच भरणा केलेली बयाणा रक्कम ₹२५ लाख अधिक अंतिम बोलीच्या १५% रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम व एकूण अंतिम बोली रकमेवरील ३% दराने होणारी जीएसटी रक्कम याप्रमाणे येणारी संपूर्ण रक्कम मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मंजुरीचे अधिन राहून, लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत संबंधित यशस्वी ई-बोलीधारक/निविदाकाराने डिमांड ड्राफ्ट(धनाकर्ष)/ई-पेमेंटद्वारे बँकेत जमा करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत धनादेश/चेक स्विकारले जाणार नाहीत. सदर रक्कम जमा न झाल्यास बयाणा रक्कम

RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

₹२५ लाख व प्राप्त १५% रक्कम जप्त होईल. त्यारकमेवर आणि चांदीच्या नाण्यांवर/वस्तूंवर लिलाव खरेदीदाराचा हक्क राहणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

२०. तथापि ज्या निविदाकारांची बोली मंजूर होणार नाही, त्यांची बयाणा रक्कम संबंधितांना त्वरीत परत करण्यात येईल. बयाणा रकमेवर कोणतीही व्याज दिले जाणार नाही. तसेच दस्तऐवज खर्च परत दिला जाणार नाही.

२१. ज्या संस्थेच्या/व्यक्तीच्या नावाने जाहीर ई-लिलाव मंजूर होईल त्या संस्थेस/ व्यक्तीस अंतिम ई-लिलाव बोली रकमेवर भरावा लागणारा आयकर कायद्यानुसारचा टीडीएस/जीएसटी/अन्य शासकीय शुल्क हा स्वतंत्रपणे ई-लिलाव रकमेव्यतिरिक्त संबंधित संस्थेस/व्यक्तीस वेगळा भरावा लागेल. त्याची जबाबदारी रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात) यांच्यावर राहणार नाही.

२२. **वरीलप्रमाणे अंतिम बोली ई-निविदा प्रक्रिया राबवून पूर्ण झाल्यानंतर त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव बँकेकडून मा.निबंधक तथा मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात येईल. त्यांचे मान्यतेनंतरच लिलाव कायम करणेत येईल. तोपर्यंत चांदीच्या नाण्यांचा ताबा बँकेकडे राहील.**

**मात्र दरम्यानच्या काळात चांदीच्या भावात चढ-उतार झाल्यास त्याचा कोणताही परिणाम अंतिम बोली रकमेवर होणार नाही व ज्या रकमेस अंतिम बोली निश्चित झाली आहे, त्या बोली रकमेत बदल होणार नाही.**

२३. दरम्यानच्या काळात भरलेल्या रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही, तसेच नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांची मंजुरी प्राप्त होताच व वरीलप्रमाणे अंतिम बोली रक्कम अधिक त्यावरील जीएसटी रक्कम याप्रमाणे संपूर्ण रक्कम बँकेत जमा असल्याची खात्री करुन अंतिम लिलाव कायम करण्यात येईल. याबाबत रोजनामा करण्यात येईल व त्यावर बँकेच्यावतीने सहया करण्याचे अधिकार संयुक्तपणे श्री.संजय सावंत, सरव्यवस्थापक, श्री.प्रविण जोशी, व्यवस्थापक, प्रशासन विभाग व श्री.श्रीनिवास कुलकर्णी, व्यवस्थापक, हिशोब विभाग यांना राहतील. त्यावर अंतिम बोलीदार व/त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचीही सही घेण्यात येऊन चांदीची नाणी/वस्तु यशस्वी बोलीधारकाच्या ताब्यात देण्यात येतील.

२४. सदर जाहीर ई-लिलावाबाबत खरेदीदार, ई-लिलावात भाग घेणारे अथवा इतर कोणाकडूनही संबंधित चांदीच्या नाण्यांबाबत काही न्यायालयीन/कायदेशीर वाद निर्माण झाल्यास/केल्यास तो फक्त पुणे येथील मा.कोर्टाच्या कक्षेपुरताच मर्यादीत राहील व त्याचा होणारा खर्च नुकसान भरपाई संबंधितांकडून वसुल केला जाईल.

२५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदी जाहीर ई-लिलाव खरेदीदारावर व जाहीर ई-लिलावात भाग घेणाऱ्यावर बंधनकारक राहतील.

२६. वरीलप्रमाणे संपूर्ण खरेदी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यवाहीबाबतचा अहवाल मा.सहकार आयुक्तालयास सादर करण्यात येईल.

स्थळ : पुणे
दिनांक : ०७.०७.२०२६

RUPEE CO-OP. BANK LTD. HEAD OFFICE PUNE

सरव्यवस्थापक अवसायक
रुपी को-ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)